# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/ १५

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील**

**दिनांक २७ एप्रिल, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बाविसावी सभा शनिवारी दिनांक २७ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षद वाघ ( प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विंनती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

**श्रद्धांजली**

**डॉ. रघुनंदन मुजुमदार**

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण मेडिकल कॉलेजचे माजी अधिष्ठाता डॉ. रघुनंदन मुजुमदार यांचे दिनांक २४ मार्च, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते.

**डॉ. जयश्री अय्यर**

वडाळा येथील डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमी महाविद्यालयाच्या डॉ. जयश्री अय्यर यांचे दिनांक २६ मार्च, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

**लवराज कांबळी**

मालवणी नटसम्राट म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ मालवणी अभिनेते लवराज कांबळी यांचे दिनांक २६ मार्च, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६६ वर्षांचे होते.

**मिलींद बेल्हे**

ज्येष्ठ पत्रकार मिलिंद बेल्हे यांचे दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५६ वर्षाचे होते.

**मीनाक्षी पाटील**

माजी राज्यमंत्री आणि शेतकरी कामगार पक्षाच्या जेष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांचे दिनांक २९ मार्च, २०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षाच्या होत्या.

**अरुणा साधू**

स्त्री चळवळीच्या माध्यमातून कार्यरत सामाजिक कार्यकर्त्या अरुणा साधू यांचे दिनांक २९ मार्च, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७४ वर्षाच्या होत्या.

**सुधीर पुराणिक**

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलसचिव प्रा. सुधीर पुराणिक यांचे दिनांक ०३ एप्रिल, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५७ वर्षाचे होते.

**डॉमनिक घोन्सालविस**

माजी आमदार डॉमनिक घोन्सालविस यांचे दिनांक ०८ एप्रिल, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षाचे होते .

**प्रमोद माने**

ज्येष्ठ पत्रकार माने यांचे दिनांक ०८ एप्रिल, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६१ वर्षाचे होते.

**मीना चंदावरकर**

जेष्ठ शिक्षणतज्ञ, लेखिका मीना मीना चंदावरकरयांचे दिनांक दिनांक १७ एप्रिल, २०२४ रोजी वृद्धपकाळाने आणि अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षाच्या होत्या.

**शिवाजीराव जोंधळे**

जोंधळे नॉलेज सिटीचे संस्थापक शिवाजीराव जोंधळे यांचे दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

**धीरूभाई मेहता**

वैद्यकीय सेवेला गांधीवादी विचाराच्या कसोटीवर तपासून आरोग्य क्षेत्रात अतुलनीय कामगिरी बजावणारे जेष्ठ गांधीवादी धीरूभाई मेहता यांचे दिनांक २२ एप्रिल, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक २५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक २५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी इरादापत्र प्राप्त संस्थेचा प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालये (कला, वाणिज्य, विज्ञान व विधी) सुरु करण्याकरिता अंतिम मान्यतेकरिता प्राप्त केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ नुसार १४ मधील १४ पात्र प्रस्ताव आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(३) (घ) नुसार २३ प्रस्ताव मधील २० प्रस्ताव हे अटीशर्तीची पूर्तता केल्या शिवाय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ला विद्यार्थी प्रवेशित करणार नाहीत असे रुपये ५०० च्या स्टॅम्प पेपर (Stamp Paper) वर प्रतिज्ञापत्र नोटराईजड (Notaried) करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली. असे एकूण ३४ पात्र प्रस्ताव शासनाकडे शिफारशी सहित सादर करण्यांची मान्यता देण्यात आली. | |
| ३ | शासन निर्णय दिनांक १ एप्रिल, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रस्तावित नविन महाविद्यालय सुरु करण्याकरिता इरादापत्र प्राप्त चेंबूर ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटी श्री. एन.जी. आचार्य कॉलेज ऑफ लॉ, संस्थेचा प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितीचा अहवाल, अधिष्ठाता मंडळाचा ठराव मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी व शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी शिफारस करिता ठेवण्यात येत आहे. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | येत आहे. | |
| ठराव | शासन निर्णय दिनांक १ एप्रिल, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रस्तावित नविन महाविद्यालय सुरु करण्याकरिता इरादापत्र प्राप्त चेंबूर ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटी श्री. एन.जी. आचार्य कॉलेज ऑफ लॉ, संस्थेचा प्रस्ताव अनुपालन अहवालासह अंतिम मान्यतेसाठी तज्ञ समितीचा अहवाल, अधिष्ठाता मंडळाचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. **शासनाकडे शिफारशी सहित सादर करण्याची मान्यता देण्यात आली.** | |
| चर्चेच्या अनुषंगाने आलेली बाब | | |
| ४ | मुंबई विद्यापीठाची पेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांची मुदत दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी संपत आहे, त्या सर्व पेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा महिने मुदत वाढ देणे बाबत. | संशोधन, प्रशासन आणि विस्तार विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाची पेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांची मुदत दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी संपत आहे, त्या सर्व पेट उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा महिने मुदत वाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| ५ | मुंबई विद्यापीठाअंतर्गत असलेल्या सर्व विधी महाविद्यालयात बार कॉन्सिलच्या निर्देशानुसार समिती पाठविण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाअंतर्गत असलेल्या सर्व विधी महाविद्यालयात बार कॉन्सिलच्या निर्देशानुसार त्रीसदस्यीय समिती पाठविण्याचा ठराव करण्यात आला. सर्व विधी महाविद्यालयाला सूचित करून समितीने **Surprise Visit** करून, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्राचार्य,Infrastructure ,विद्यार्थी संख्या , वेळापत्रक इत्यादी बाबींची सखोल माहिती Format मध्ये द्यावी असे ठरले.<br>**Dean IDS** यांनी तयार केलेली चेक लिस्ट सर्व महाविद्यालयांनी पाठवून त्यांची सर्व माहिती विभागाने संकलित करावी, असे ठराव करण्यात आला. | |
| ६ | घटनापीठासमोर असलेल्या Industry Status च्या केस मध्ये विद्यापीठाने Intervention करण्याची परवानगी बाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | घटनापीठासमोर असलेल्या Industry Status च्या केस मध्ये विद्यापीठाने Intervention करण्याची परवानगी देण्याचा ठराव करण्यात आला. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

Baliram

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू